# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १३/०५/२०२४ (सोमवार) सकाळ**


## अवैधरीत्या जनावरांची वाहतुक करणाऱ्या आरोपींविरूद्ध गुन्हा नोंद

दिनांक १२/०५/२०२४ रोजी चे १९/३० वा. दरम्यान पो.स्टे. मौदा येथील स्टाफ पो.स्टे. मौदा हद्दीत अवैध गोवंश वाहतूकीस आळा घालणेकरिता पेट्रोलिंग करीत असताना भंडारा कडुन नागपूरच्या दिशेने NH-53 महामार्गाने लहान मालवाहू चारचाकी वाहन क्र. MH-30/BD -1547 मधून अवैधरित्या निर्दयतेने गोवंश जनावरांची वाहतूक होत असल्याची माहिती मिळाल्याने मौजा माथनी शिवारात टोल नाक्यावर नाकाबंदी करून नमूद वाहणाला पकडून पाहणी केली असता वाहन क्र. MH-30/BD-1547 मध्ये १६ गोवंशिय जनावरे अत्यंत निर्दयतेने कोंबून, आखूड दोरखंडाने बांधुन व जनावरांची चारापाण्याची कोणतीही व्यवस्था न करता कत्तली करिता घेऊन जातांना मिळून आल्याने वाहन चालक नामे– जाहिद बब्बू खान, वय ३४ वर्ष, रा. कामगार नगर कामठी व वाहक नामे फैजल/समसल/इमरोज मोहम्मद अशपाक वय १९ वर्ष रा. बुनकर कॉलोनी, कामठी यांना ताब्यात घेऊन त्यांचे ताब्यातून १६ गोवंशिय जनावरे किंमती २,६५,०००/– रू व मालवाहू वाहन क्र. MH-30/BD -1547 किंमती ५,००,०००/– रु. तसेच दोन मोबाईल फोन किंमती ११,०००/– रू. असा एकूण ७,७६,०००/– रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून सदर वाहना मधील गोवंशिय जनावरांना योग्य व्यवस्थापनार्थ गोरक्षण केंद्र भंडारा येथे दाखल करून आरोपीतांविरुद्ध कलम ११(१) (ड) प्रा. छळ प्रति. अधि. १९६० सहकलम ५ अ (१), ९ महा. प्रा. सं. अधि. १९७६ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली मा. उपविभागीय पोलीस अधिकारी कामठी विभाग, ठाणेदार पोलीस निरीक्षक सतीशसिंह राजपूत, सपोनि मनोज चौधरी, पो.उपनी महेश बोथले पो.ना. अजय वाघमारे यांनी केली.




पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर